जा.कं.सनिमं/कक्ष-१/सिध्दापुर/प्राधिकृत अधिबदलआदेश/१८०/सन २०१८.
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मंगळवेढा यांचे कार्यालय,
मंगळवेढा, दिनांक :- २१ / ०५ / २०१८.

**वाचले** :- (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-१ (अ)
(२) या कार्यालयाचे जा.क्र सनिमं /प्रशा/क७७-१(अ)/प्राअधि/५१/२०१७ दि.१३/०४/२०१७ रोजीचा आदेश
(३) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्रं. विपू / आस्था/पदो/विनो/३/१/२६३/ सन २०१८, दि.२३.०४.२०१८ रोजीचा आदेश

ज्या अर्थी, सिध्दापुर तांडोर वि.का.सेवा सहकारी संस्था,मर्या.सिध्दापुर तांडोर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर नोंदणी क्रमांक १३६२०, दि.१४/०१/१९४३ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत झालेली सहकारी संस्था आहे.

ज्या अर्थी, नोंदणीकृत संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व संस्था मंजूर उपविधीनुसार कामकाज करणे आपणांवर बंधनकारक आहे.

ज्या अर्थी वरील संदर्भ क्रं २ अन्वये सिध्दापुर तांडोर वि.का.सेवा सहकारी संस्था,मर्या सिध्दापुर तांडोर , ता. मंगळवेढा, जि. सोलापूरया संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणुन या कार्यालयाने श्री व्ही.एस.नाकेदार अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मंगळवेढा यांची नियुक्ती करण्यात आलेली होती.

ज्याअर्थी संदर्भ क्र.३ अन्वये श्री व्ही.एस.नाकेदार, प्राधिकृत अधिकारी तळसंगी वि.का.सेवा सहकारी संस्था,मर्या.तळसंगी, यांची पदोन्नतीने या कार्यालयातुन बदली झालेली आहे.

त्या अर्थी वरीलप्रमाणे आदेशात खालीलप्रमाणे अंशतःबदल करीत आहे.

*** अंशत बदल आ दे श ***

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ १ (अ)(ब) चे तरतूदी नुसार व त्या अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, एम.एल.शिंदे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर असा आदेश देतो की, व्ही.एस.नाकेदार, सह.अधि.श्रेणी-२ यांचे ऐवजी श्री एस.एस.जाधव,मुख्यलिपीक अधिन सहाय्यक निबंधक सह संस्था मंगळवेढा यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नेमणुक करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेचा पदभार तात्काळ स्विकारुन संचालक मंडळाची निवडणूकीची प्रक्रिया तात्काळ कायदा, कानू व उपविधीनुसार संस्थेच्या समितीची निवडणूक घेऊन, निवडून येणाऱ्या लोक प्रतिनिधीकडे संस्थेचा कारभार सुपूर्त करावा.

हा आदेश माझी आज दिनांक २१/०५/२०१८ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेनिशी पारीत करणेत आला आहे.

स्थळ : मंगळवेढा.
दिनांक : २१ / ०५ / २०१८.

(एम.एल.शिंदे.)
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, मंगळवेढा.**

प्रति,
०१ सचिव,
सिध्दापुर तांडोर वि.का.सेवा सहकारी संस्था,मर्या.सिध्दापुर तांडोर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.
०२. श्री एस.एस.जाधव,मुख्यलिपीक अधिन सहाय्यक निबंधक सह संस्था मंगळवेढा.

२/- यांना उपरोक्त आदेशानुसार सूचित करण्यात येते की, आपण सदर संस्थेच्या दप्तराचा संपूर्ण चार्ज त्वरीत स्विकारुन तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

०३) व्ही.एस.नाकेदार, सह.अधि.श्रेणी-२ .